<u>नियमित दिवाणी दावा क्र.०५/२०१७ मधील नि.क्र.५३ खालील आदेश</u>

**०१.** प्रस्तुतचा अर्ज वादीने वादपत्रात दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

**०२.** सदरचा दावा वादींनी दावा अतिक्रमण दुर करुन मिळकतीचा ताबा मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. प्रतिवादीनी प्रस्तुत दाव्यामध्ये हजर राहून वादीचे कथन नाकारलेले आहे. प्रस्तुतचा दावा वादीच्या पुराव्यासाठी प्रलंबित असताना वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. वादीचे असे कथन आहे की, दि.१६/०१/२०१७ रोजी नि.क्र.०१ वरील आदेशाप्रमाणे प्रस्तुत दाव्यातून मुळ प्रतिवादी क्र.३ नामे सरपंच ग्रुपग्रामपंचायत, आंबेत यांना कमी करण्यात आलेले होते. त्यानंतर दि.२५/०६/२०१८ रोजी नि.क्र.२० वरील आदेशान्वये प्रस्तुत दाव्यात महादेव रामा आंबेकर यांना प्रतिवादी क्र.३ म्हणून सामील करण्यात आले होते. तरी, दाव्याच्या परिच्छेद क्र.३, ४ व ५ मध्ये ज्या ज्या ठिकाणी **प्रतिवादी क्र.३** नमूद करण्यात आलेले आहे त्या त्या ठिकाणी वादी यांना **ग्रुपग्रामपंचायत, आंबेत** असे नमूद करण्याची आवश्यकता भाग पडलेली आहे. त्यानुसार वादी यांनी प्रस्तुत अर्जान्वये सदरच्या परिच्छेदांमध्ये **"प्रतिवादी क्र.३"** हा मजकूर काढून त्या ठिकाणी **"ग्रुपग्रामपंचायत, आंबेत"** असा नमूद करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे. वादीचे कथन असे आहे की, सदरची फॉर्मल स्वरुपाची असून सदर दुरुस्ती मुळे नवीन केस निर्माण होणार नाही.

**०३.** प्रतिवादीनी त्याचे म्हणणे सदरच्या अर्जाच्या पाठीमागे दिलेले आहे. त्यांनी योग्य ते आदेश पारित करण्यात यावा असे सांगितलेले आहे.

**०४.** अर्ज व म्हणणे तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. सदरच्या दाव्यामध्ये पुरावा दाखल करण्यात आलेला नाही. मागणी केलेली दुरुस्ती फॉर्मल स्वरुपाची आहे. प्रस्तुत प्रकरणातील परिस्थिती याचा विचार करता माझे मते मागणी केलेली दुरुस्ती मंजुर केल्यामुळे पक्षकारांमधील खराखुरा वादातीत प्रश्न अंतीमरित्या निर्णीत करण्यास मदत होणार आहे. सबब वर नमुद कारणांकरीता मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने परिच्छेद क्र.२ मध्ये उल्लेख केलेली दुरुस्ती आजपासून १४ दिवसांच्या आत करुन घ्यावी.

SAMEER KADER SHAIKH Digitally signed by SAMEER KADER SHAIKH Date: 2026.02.13 16:29:13 +0530

(एस.के.शेख)

दि.१३/०२/२०२६. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, श्रीवर्धन.